# सामंजस्य करार

## पोलीस स्टेशन, देगलूर

## आणि

## एन. सी. सी. विभाग,

## देगलूर महाविद्यालय, देगलूर



अ. व्या. शिक्षण संस्था संचालित,

# देगलूर महाविद्यालय, देगलूर

**पोलीस स्टेशन, देगलूर :**

पोलीस स्टेशन, देगलूर हे देगलूर शहरात कार्यरत असून देगलूर शहर आणि तालुका यामध्ये शांतता व सुव्यवस्था ठेवण्याचे काम करते. सध्या पोलीस स्टेशन मध्ये ८३ कर्मचारी कार्यरत असुन पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात ६४ एवढी गावे / एरिया येतो.

**देगलूर महाविद्यालय, देगलूर :**

अ.व्या. शिक्षण संस्था संचालित देगलूर महाविद्यालय ही नांदेड जिल्हयातील एक अग्रगण्य शिक्षण संस्था आहे. देगलूर महाविद्यालयाची स्थापना इ. स. १९६३ ला झाली आहे. महाविद्यालयामध्ये इ. स. १९६४ पासून एन. सी. सी. विभाग सक्रिय पणे कार्यरत आहे. सध्या महाविद्यालयात या विभागाची धुरा ले. डॉ. निरजकुमार उपलंचवार हे सांभाळत आहेत.

**सामंजस्य कराराची निकड :**

पोलीस स्टेशन देगलूर यांच्या कार्यक्षेत्राचा व्याप व उपलब्ध कर्मचारी यांची संख्या विषम आहे. देगलुर शहरात सार्वजनिक व धार्मिक उत्सवाच्या काळात शहरात शांतता व सुव्यवस्था ठेवताना पोलीस यंत्रणेवर प्रचंड ताण येतो. सार्वजनिक व धार्मिक उत्सवाच्या काळात शहरात शांतता व सुव्यवस्था ठेवण्यासाठी एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांची मदत होऊ शकते. विद्यार्थ्यांच्या सहभागामुळे पोलीस यंत्रणेवरील ताण कमी होण्यास मदत होईल.

**सामंजस्य कराराचे स्वरुप :**

सामंजस्य कराराचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.

१. सार्वजनिक व धार्मिक उत्सवाच्या वेळेस महाविद्यालय एन. सी. सी. च्या विद्यार्थ्यांना बंदोबस्तासाठी पाठवेल.

२. बंदोबस्तासाठी आलेल्या विद्यार्थ्यांच्या अल्पोहराची व्यवस्था पोलीस प्रशासना मार्फत केली जाईल.

३. पोलीस बंदोबस्तास मदत करणाऱ्या विद्यार्थांना पोलीस अधिकाऱ्यां मार्फत काही तासांचे विशेष प्रशिक्षण दिले जाईल.

४. एन. सी. सी. विभागातील ज्या विद्यार्थ्यांना पोलीस दलात / सैन्य दलात जाण्याची ईच्छा आहे अशा विद्यार्थ्यांना पोलीस भरतीसाठी चे विशेष प्रशिक्षण व मार्गदर्शन पोलीस स्टेशन, देगलूर यांच्या कडून दिले जाईल.

५. पोलीस भरती प्रशिक्षणासाठी महाविद्यालय आपले क्रीडांगण उपलब्ध करुन देईल.

६. पोलीस दलातील विशेष प्रशिक्षणासाठी देखील महाविद्यालयाचे क्रीडांगण उपलब्ध करुन देण्यात येईल.

६. विद्यार्थ्यांना कायदा व सुव्यवस्थे चे प्रशिक्षण पोलीस स्टेशन देगलूर मार्फत दिले जाईल.

७. पोलीस मित्र या योजनेत विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग राहील.

८. महिला सुरक्षा समिती मध्ये महाविद्यालयाचा प्रतिनिधी राहील.

**सामंजस्य कराराचा कालावधी :**

सदरील कराराचा कालावधी हा कराराच्या तारखेपासून पुढील पाच वर्षासाठी असेल (२०१६ ते २०२०) तथापि काही कारणास्तव महाविद्यालय अथवा पोलीस प्रशासनास सदरील सामंजस्य करारात काही अडचणी वाटल्यास सदरील सामंजस्य करार रद्द करण्याचा अधिकार उभयंताना असेल.

| | | |
|---|---|---|
| **श्री एस. एस. शिंदे** | **ले. डॉ. निरजकुमार उपलंचवार** | **डॉ. अशोक वाकोडकर** |
| **पोलीस निरीक्षक** | **एन.सी.सी. कंपनी कमांडर** | **प्राचार्य** |
| **पोलीस स्टेशन,** | **देगलूर महाविद्यालय,** | **देगलूर महाविद्यालय,** |
| **देगलूर** | **देगलूर** | **देगलूर** |